REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 8 | MAY - 2026

# अस्पृश्यता निवारण्यात गाडगे महाराजांचे योगदान

**प्रा.डॉ.मिलिंद द.तायडे**
**जगदंब महाविद्यालय, अचलपूर जि. अमरावती.**

## प्रस्तावना



२० व्या शतकातील थोर संत, समाजसुधारक आणि लोकशिक्षक असलेल्या कर्मयोगी संत गाडगेबाबांचा जन्म दिनांक २३ फेब्रुवारी १८६६ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव या छोट्याशा गावी झाला. त्यांच्या आईचे नाव सखुबाई व वडिलांचे झिंगराजी जानोरकर होते.गाडगे बाबांच्या वडिलांना दारूचे व्यसन लागल्यामुळे इ. स. १८८४ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. गाडगे बाबांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती वडिलांच्या मृत्यूनंतर त्यामध्ये अधिकच भर पडली. नंतर गाडगे बाबा व त्यांची आई मूर्तिजापुर तालुक्यातील दापुरी या मामाच्या गावी आले.बाबांच्या मामाचे नाव चंद्रभानजी होते. मामाच्या घरी शेती असल्यामुळे गाडगेबाबा शेतीची आणि गुरेढोरे चारण्याची कामे करू लागले. गुरे-ढोरे चारतांनाच बाबांना भजनाचा नाद लागला बाबा आपल्या सवंगड्यांसोबत बसून भजन करत असत.

इ.स. १८९२ मध्ये कमालपूर येथील घनाजी खल्लारकर यांची मुलगी कृताबाई सोबत गाडगे बाबांचा विवाह झाला. याच काळात मामा चंद्रभानजी यांचा सावकाराच्या कर्जाच्या दडपणाने मृत्यू झाला. परंतु गाडगे बाबांनी संसाराची जबाबदारी सांभाळून सावकाराचे कर्जही फेडले. मात्र सावकाराने कागदपत्री लबाडी करून मामाच्या नावावरील कर्ज तसेच कायम ठेवले. गाडगे बाबांनी या सावकारासोबत संघर्ष करून मामाची जमीन सावकाराच्या तावडीतून सोडवली. या प्रसंगापासून पंचक्रोशीतील शेतकरी गाडगे बाबांना मान देऊ लागले. ते गाडगे बाबांना देवीसिंग या बहुमानवाचक नावाने संबोधित. गाडगे बाबांनी याच काळात लोकसेवेला प्रारंभ केला. नदीकाठचे रस्ते पावसाळ्यात नादुरूस्त झाले की ते स्वतः कुदळी, फावडे घेऊन दुरूस्त करायचे. कुठे कचरा दिसला, घाण दिसली की साफ करायचे. प्रारंभी इतर लोक आश्चर्याने पाहायचे नंतर ते सुद्धा गाडगे बाबांसोबत कामाला लागायचे. समाजातील दारिद्य अज्ञान,अंधश्रद्धा पाहून गाडगेबाबांच्या मनामध्ये वैराग्याची भावना निर्माण झाली एक फेब्रुवारी १९०५ च्या रात्री गाडगेबाबांनी गृहत्याग केला तेव्हा पासूनच बाबांनी समजसुधारणेच्या कार्याला स्वतःला समर्पित केले. संत गाडगे महाराजांनी अस्पृश्यता निवारणासाठी आपल्या कार्यातून आणि किर्तनातून मोठे कार्य केले. त्यांनी आपल्या किर्तनातून लोकांना सांगितले की जगात जाती फक्त दोनच आहेत: एक पुरुष आणि दुसरी स्त्री. तिसरी जात नाही.

गाडगे बाबा म्हणतात की, माणसात देव आहे आणि माणसांची पूजा करा. देव देवळात किंवा दगडात नाही, तर जिवंत माणसात आहे. जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असा स्पष्ट संदेश ते देत असत. गावागावात कीर्तन करून त्यांनी लोकांच्या मनातील अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि जातिभेद यावर प्रखर टीका केली.अस्पृश्यता

केवळ कायद्याने नव्हे, तर मतपरिवर्तनाने जाईल, हे ओळखून त्यांनी आपले विचार जनतेपुढे मांडले संत गाडगे महाराजांनी आपल्या सुलभ, स्पष्ट आणि कृतीशील उपदेशाद्वारे समाजातील जातिभेद व अस्पृश्यतेवरून कठोर प्रहार करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे महत्त्वपूर्णकार्य केले.

## बालपणातच अस्पृश्यता निवारण्याची पाया उभारणी :-

१८ व्या १९ व्या शतकात संपूर्ण भारतामध्ये अंधश्रद्धा अस्पृश्यता,रूढी परंपरा याचे स्तोम माजले होते दरिद्रता आणि निरक्षरता यामुळे समाज अधोगतीला जाऊन पोहचला होता. अंधश्रद्धा रुढी, परंपरा, याला गाडगे बाबांचे वडील झिंगराजीसुद्धा बडी पडले होते. झिंगराजीच्या व्यसनामुळेच संपूर्ण कुटुंबाला दारिद्रतेचे उपासमारेचे चटके सहन करावे लागत होते.तेव्हा डेबूजी ७ ते ८ वर्षाचे असतात त्यांच्या वडीलांच्या मृत्यूमुळे पत्नी सखुबाई मुलगा डेबूजी यांच्यावर दु:ख चा डोंगर कोसळला.पतीचा मृत्यू नंतर सखुबाई आपल्या मुलाला घेऊन मामाच्या घरी दापुरा येथे आली. त्यानंतर डेबूजी मामाच्या घरीच राहू लागला. आपले संपूर्ण आयुष्य येथेच काढायचे आहे त्यासाठी मिळेल ते काम आपल्याला केले पाहिजे याची जाणीव तिला होती त्यामुळे सखुबाई सकाळी लवकर उठून दडन दडणे, झाडझुड, भांडी धुणे,हाती लागेल ते काम सकाळ पासून तर संध्याकाळीपर्यंत करत असे.आपल्या आईचे कष्ट डेबूजी पहात असे एकदा ती म्हणाली माझ्या लेकरा काम करत राहला की माणूस कुणाच्या डोक्यावर येत नाही? म्हणून माणसाने माणसासारखे काम करावे फुकट खाऊ नये असा काम करण्याचा दिलेला गुरुमंत्र डेबूजीनी आयुष्यभर पडला.

परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही मामाच्या घरी गुरे ढोरे होती.आईने सांगितले होते माणसाने काम करत राहावे. डेबूजी राणात गुरे ढोरे चारायला घेऊन जाऊ लागले गावातील अनेक मुले गुरे चरायला नेत असत सर्व गुराखी मुले वेगवेगळ्या जातीतील होती.जेवणचाची वेळ झाल्यावर बाबा सर्वांच्या शिदोऱ्या एकत्रित करून सर्वांना सामूहिक सहभोजन करण्याकरीता बसवित. यातूनच बालपणतच बाबांनी अस्पृश्य तेला तडा देण्याचा पर्यंत केला.

डेबूजीनी आपल्या गुराखी मित्रांनासुद्धा भजनाची आवड लावली त्यांचे बाल भजन मंडळ तयार झाले. बाबांच्या भजन मंडळात बबन नावाचा महाराचा मुलगा होता बाबा त्याला सोबत घेऊन जेवण करत असत टिनपत्राच्या झंज्या रॉकेलच्या रिकाम्या डब्याचे ढोल ही त्यांनी वाद्य सामुग्री होती. पाहता पाहता त्यांच्या भजन मंडळाचे सप्ते होऊ लागले त्याच्या समाप्तीला भंडाराचे कार्यक्रमाचे आयोजन डेबूजी आपल्या सवंगडय़ा सोबत मिळून करीत असत. या भंडाराच्या कार्यक्रमा मध्ये डेबूजीनी गावातील अस्पृस्य अंध अपंग भिकारी या सर्वाना एका रांगेत जेऊ घातले या घटनेचा गावातील मंडळींनी विरोध ही केला बाबांनी गावकरी मंडळीचे मत परिवर्तन करण्याचा पर्यंत केला त्यांना समजावून सांगितले, ही एक क्रांतिकारी घटना होती. माणसा-माणसात भेद करणे हे एक महापाप आहे असे सांगुन बाबांनी आयुष्यभर अशाच प्रकारचे कार्यक्रम करून समाजातील बुरसटलेल्या विचारांची घाण दूर करण्याचा पर्यंत केल्याचे दिसून येते.

त्यांच्या बालपणतच महान कार्याचे मूळ होत. त्यांच्या मनातील समतेची भावना सेवाभाव समाजातील प्रत्येक घटकाला समान दृष्टीने पाहण्याची वृत्ती या सर्वांचा उगम त्यांच्या बालपणात झाला.

## गाडगेबाबांचा गृहत्याग आणि अस्पृश्यतेचे स्वानुभव :-

संत गाडगे बाबांनी १ फेब्रुवारी, १९०५ रोजी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला आणि लोकसेवेचे व्रत घेतले.त्यांच्या गृहत्यागामागील प्रमुख कारण आणि उद्देश सामाजिक सुधारणेचा ध्यास होय त्यांचे मन संसारात फारसे रमले नाही. समाजातील कमालीचे अज्ञान, अनिष्ट रूढी-परंपरा, अंधश्रद्धा (जसे की देवदेवस्की, जादूटोणा)

आणि व्यसनाधीनता (दारू, मांसाहार) यांमुळे लोकांच्या वाट्याला येणारे दु:ख पाहून त्यांचे मन उदास झाले. अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले.

गृहत्यागा नंतर संत गाडगे बाबांचा वेष अत्यंत साधा, फाटका आणि फकीरी स्वरूपाचा होता. त्यांनी जाणीवपूर्वक हा वेष धारण केला होता, कारण त्यांच्यासाठी हेच त्यांच्या निरपेक्ष लोकसेवा आणि साधे जीवन या मूल्यांचे प्रतीक होते. डोक्यावर खापराच्या तुकड्याची टोपी किंवा फुटके मातीचे मडके (गाडगे) पालथे ठेवत असत. (या 'गाडग्या' मुळेच लोक त्यांना 'गाडगे बाबा' म्हणून ओळखू लागले.) त्यांच्या अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे असत ज्या गावात जातील, ते गाव सर्वप्रथम स्वच्छ करण्यासाठी ते सतत हातात एक खराटा बाळगत. पाणी पिण्यासाठी किंवा भिक्षा मागून आणलेले अन्न खाण्यासाठी ते हे फुटके मडके वापरत: एका कानात कवडी आणि दुसऱ्या कानात फुटलेल्या बांगडीची काच असे. असा विचित्र वेष बाबांचा होता.

रोज सकाळी उठणे, पुढे जाणे, वाहत असलेल्या नाल्याप्रमाणे खळखळ करीत मार्गात आलेल्या अडथळ्यांचा सामना देत, संकटाशी झुंज देत या प्रमाणे डेबूजी फिरत होते कशाची पर्वा न करीता. समाजाच्या स्थितीची पाहणी करून, त्याचे दारिद्र पाहत, अज्ञानाचे निरीक्षण करीत होते व सतत बाबांचे भ्रमण सुरु होते.

या देशभ्रमणात त्यांना समाजातील अनेक वाईट गोष्टींचा अनुभव आला. लोकांची दयनीय अवस्था त्यांनी बघितली. त्यांना अनेक कटू अनुभवांना तोंड द्यावे लागले. समाजात असलेली दैना अवस्था, जाती भेदाची विषासारखी विषमता, ही त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिली. बाबा समाजाच्या जवळ जाऊन त्या समाजात मिसळून, निरपेक्ष वृत्तीनेते समाजाचे अत्याचार पाहत होते. अस्पृश्यांना काय सोसावे लागते बाबांनी भ्रमणकाळात खुप जवडून पहिले होते आपण होऊनच आपली जात महार, मांग, ढोर वाटेल ते सागुन किती घाव बाबांनी स्वतःच्या अंगावर ओढवून घेतले होते लोकांचा शिव्याशाप सहन करीत हिंडत असत. परंतु ! समाज आंधळा झाला होता. डोळे असून त्याला हे दिसत नव्हतं, दिसत असून हे सर्व ते सहन करीत होता. सहन केल्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हत, परंतु समाज सेवेकरिता बाबांनी जीवाचं रान केलं, देहाची पर्वा केली नाही, ते फिरत राहिले. फिरता फिरता गावाजवळील विहिरीवर ते जात आणि तहान लागली म्हणून पाणी मागत. शेतकरी त्यांना नाव गाव विचारी बाबा हळूच त्याला प्रति प्रश्न विचारती, आम्हा महार लोकांची विहीर हीच व्हंय का ? हे विचारल्यावरोवर शेतकरी रागाने लाल होई. तू महार होय । म्हणून त्यांना काठीने बदडण्यास सुरवात करी. बाबा त्या वेदना गुपचूप सहन करीत तेथून निघून पुढे जात. गावात गेल्यावर एखाद्या ओसरीवर बसून कोण्या माय बहिणीला पाणी मागत. त्यांना तेथेही तोच प्रश्न विचारण्यात येई. बाबा निःसंकोच उत्तर देत, चांभार आहो ना जी तोंडातून शब्द निघताच बाबांना त्या बाईकडून असंख्य शिव्यांचा मार बसत असे.

ह्या जातीभेदाबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण झाली आणि ते समाजाला प्रतिप्रश्न विचारू लागले, सर्वांच्या जन्माची वाट एक आहे आणि जायची सुद्धा एक आहे. मग ही शिवाशिव कशी जन्माला आली ? ह्या जातीभेदापायी आपल्या समाजात दुही निर्माण झाली. जातीभेद समाजासाठी एक कलंक आहे. हा कलंक धुवून निघला पाहिजे. ह्या जातीभेदापायी आपला सत्यानाश झाला. आपला धर्म बुडाला आहे. धर्माला आहोटी लागली आहे. कित्येक लोक आपल्या धर्मातून परधर्माचा आश्रय घेतात, तरीही आपले डोळे लागले आहेत.

महारासो शिवे कोपे ब्राम्हण तो नोहे ।
विटाळ काय आहे? परद्रव्य पर-नारी।
येथूनी जो दूरीसोवळा तो ॥

भ्रमण करीत असतांना विषमतेचे अनुभव त्यांना पदोपदी येत असे. एक दिवस बाबांना फिरता फिरता भूक लागली होती. बाबांनी एका दाराशी जावून भिक्षा मागीतील व म्हणाले पाटीलबुवा जेवतात ते जेवण द्या. बाईने

पाटलाला जावून सांगितलं. पाटील रागाने बाहेर आला आणि विचारू लागला. काय पाहिजे रे तुला. बाबांनी निश्चयी स्वरात उत्तर दिले, तुम्ही जेवता ते.तोच पाटलांनी जवळ पडलेली काठी उचलली आणि बाबांना अक्षरशः झोडपून काढलं. भ्रमण करीत असता बाबा कुणाची लाकडं फोडीत, जो सांगेल ते काम करीत, तोंडातून चकार शब्द न काढता. मोबदला न घेता ते काम करीत. काम केले की बाबा तेथून दुसरीकडे जात कुणाला दिसत नसत. असे विषमतेचे अनुभव बाबांनी स्वतः घेतले वेळ प्रसंगी मारही खाल्ला परंतु बाबा आपल्या कार्यप्रती एकनिष्ठ राहीले.

## कीर्तनाच्या माध्यमातून अस्पृश्यतानिवारण :-

गाडगे बाबांनी आपल्या कीर्तनातून अंधश्रद्धा, रूढी, व्यसने, जातीयभेद यांसारख्या सामाजिक समस्यांवर थेट टीका केली आणि लोकांना स्वच्छतेचे, शिक्षणाचे व माणुसकीचे महत्त्व समजावले. ते वऱ्हाडी भाषेतून, अगदी साध्या आणि सहज समजेल अशा शब्दांत लोकांशी संवाद साधत असत. त्यांचे बोलणे अत्यंत स्पष्ट आणि थेट असायचे.गाडगे बाबांनी आपल्या कीर्तनातून अस्पृश्यता आणि जातिभेद यावर जोरदार टीका केली. ते लोकांना समजावून सांगायचे की सर्व मानव एकच आहेत आणि कोणीही कोणापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही. ते लोकांना जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असा उपदेश करत असत. माणसा-माणसात भेद करणे हे पाप आहे, देव प्रत्येकात आहे, दगडांत नाही, अशी त्यांची रोखठोक शिकवण होती. किर्तनात तर शिवशिव या शब्दावर टीका करीत बाबा म्हणतं असत.

**कुंकून काय जानं ह्या शब्द पेंदा झाला _**

- शिवशिव
- गनपतराय आहे, संपतराव आले, हरभट आले, मारभट आले-
- तर मग या इकडन।
- कुन्नीकडून ।
- लोक उत्तर देत ---- इकू ऽन ।
- बाबा फटकारा हाणीत,
- अन् ह्या शिव्या महार आला, शिरप्या मांग आला-
- अरे कुनीकडे चालला धसाधता १ जा तिकू ऽ न !
- कुनीकडून?
- लोक उत्तर देत,
- टिकूडन !!
- का बा ! तिकून काहुन । इकून आला तर धरती बाटते काय ?

बाबांच्या भजन मंडळींत शंकरराव संभूस नावाचे ब्राह्मण गृहस्थ होते नेहमी ते बाबांबरोबर असत. त्यांना उभे करून बाबा विचारीत.

का हो भटजी महाराज, तुमाले दात किती ?

शंकरराव म्हणत

__बत्तीस !

__का चौतीस आहेत

__नाहीत !

__आन् अर्जुन्या मांगाले किती १

__त्यालाही बत्तीस !

__का सत्तावीस अठ्ठावीस आहेत ?

__नाहीं !

तुम्ही आईच्या पोटात किती दिवस १ नऊ महिने नऊ दिवस! हरिजन किती दिवस ? चार महिने का साहा महिने ?

- नाऽहीं- नाऽहीं!

असा प्रति प्रश्न जनतेला विचारीत असे

उगंच काहीं तरी शिवशील? अरे अरे! हे असे नाहीं चालनार. दोन दाखवा. मंग सांगा. कोनी म्हणेल शास्तर शास्तर कोनालाही करता येईल. कोन्याही जातीचे पन्नास पोरं जमवा, शिकवा त्याले. वेद बोलून घ्या. भागवत ऐकूं द्या- जे सांगेल ते. पन मुळांतून देवाच्या घरून काय दोन आहे ते दाखवा. तुमची आमची गंगा एक की दोन

- एऽक !

हे ऽ इकडून निघाली मराठ्याची नदी, ती मांगाची आली तिकडून. असे आहे का ? लोक मानायचे

- नाऽहीं !

असे प्रश्न विचारून जनतेकडून उत्तर वधवून घेत होते.

हिंदुस्थानाले डाग आहे शिवाशिविचा विलायतमधे शिवशील मानतात का कोनी नाहीं रशियाच्या राज्यांत ? नाही जपानमधे ? नाहीं. चीनमधे नाहीं? लंडनमधे ? नाहीं. अमेरिकीमधे नाही. फारशी लोकांत नाहीं ? ख्रिश्चन लोकांत नाहीं ? मुसलमानांत नाहीं ? म्हटलं होतं हाज़रतनं कधी? की बिटाल डाला सालेने, पानी बिटाल दिया. म्हटले होतं? नाऽहीं !

मुसलमानाच ख्रिश्चनानचं पाणी बाटत नाहीं, अन् साले तुनचे पाणी कसे भिकार चोट आहे? — अन् मोटारीत बसतानी तुमची अक्कल कुत्र्यानं खाल्ली का ? नारायान पटेल बैठो ! गणाप्पा बसा केशवराव मटभी-बसा ! शिवऱ्या मांग बसा ऽ ! मग का नाहीं म्हणत, मोटर बाटली, मांग बसला, आम्ही नाहीं बसत । पोकळ ! उंदीर कुठी उकरते ? पोकळ जागा । पोकळ जागा. खडक लागला कीं उंदीर पलटला. मोटारीपार्शी तुम्हाले कोन फुटाने देईल ? शिवाशिव काढा. सरळ शहाने व्हा. अन् मानूसपना पैदा करा. या शिवाशिवीने लाखो लोक खिरीश्चन झाले. लाखो लोक मुसलमान झाले. या शिवाशिवीनं हिंदुधर्माचा घात केला.

हे ‘शिवशीव ’ कोन्या काखोटींतून काहाडलं म्हनाव् ? महारांचा जो देव, तोच मराठब्राह्मणचा, मांगाचं जे आकाश, तेच गुजराध्यामारवाड्याचं, चांभार-भांग्यांचं, जो सूर्य, तोच कुणबीशेनव्याचा का त्यांचा वेगळा आहे

नाऽहीं ऽ! असे प्रश्न विचारून बाबा आपले मत पटऊन देत असे. बाबांचे अनुयायी मोठमोठे सप्ते करीत. सात दिवस अखंड बीणावादन आणि नाम-स्मरण होत असे. रोज रात्री त्या बाबंच्या अनुयायाचे कीर्तन होत असे आणि शेवटच्या दिवशीं स्वतः बाबा येत. रात्रीं हजारों लोक जमत. बाबांचे कीर्तन होई. दुसरे दिवशी भंडारा होत असे.

दुसऱ्या दिवशी पाहाटे उठून बाबा पुनः सगळे स्वच्छ झाडून काढीत. चुन्यानें ओळी आंखून घेत.आलेल्या सर्व भक्तांना एकाच वेळीं जेऊ घालीत. स्पृश्य आधी आणि अस्पृश्य नंतर, हे बाबांस खपत नसे.

१९३४ ला निजामशाहीतील बारा शिवेचा मारोती हे बारा गावाच्या सिमेवरील प्रसिध्द देवालय आहे ते परभणी जिल्हयात असुन बारा गाव मिळुन सप्त्याचे आयोजन केले होते या सप्त्यामध्ये शेवटच्या दिवशी बाबांचे किर्तन होते.लक्षावधि लोक कीर्तनास जमले होते. त्या सर्वांसाठीं अन्न शिजले होतें. दुसरे दिवशीं सकाळपासून बाबांनी ओळी आखून पंगती बसवायला प्रारंभ केला.एखाया वाघासारखे बाबा हिंडत होते. लोकांना पंगतींत बसवीत होते. आदल्या रात्रीही जेवण पदरी पडले नव्हते. सगळे अनुयायी भुकावले होते. पण कोणालाही भुकेचे नांव काढायची सोय नव्हती. सारखे काम करावे लागत होते.

अचानक पंगतींत ओरडा झाला. बाबांनी काय म्हणून विचारणा केली. पाहिले तर कांहीं सवर्ण दहावीस अस्पृश्यांना ढकलीत बाबांकडे येत होते. बाब म्हणाले

काय होय जी!
हे म्हारडे ! हे आम्हाबरोबर जेवायला बसले ।
रागाहून बाबा म्हणाले,
त्याहिलेही भुका लागल्या असतीन् जेवायले ना वाढसान् का त्याहिले ?
आम्हा बरोबर नव्हे, आमचं सगळ्यांचं उरकल्यावर, शेवटीं !
त्या महारांकडे पाहात बाबा कडाडले,
का रे, इतकी लाज नाई तुम्हाले ? समद्याचं झाल्यावर उरलंसुरले खान्यापरीस पोटांत काटे का भरीत नाई ? चाला जी आमची मंडळी! अथी राहायचं नाई, जेवायचं नाई!

आणि तसेच भर उन्हांत, पाण्याचा घोटही न घेता बाबा ती जागा सोडून निघून गेले . ज्या पंगतींत महारांना सर्वांत शेवटीं काय उरेल ते मिळणार होते, त्या पंगतीकडे बाबांनी, ढुंकूनही पाहिले नाही.

संत चोखामेळा हे महार समाजातून आलेले महान संत होते. त्यांना उच्चवर्णीयांकडून मंदिरात प्रवेश नाकारला गेला असला तरी, त्यांनी आपल्या अभंगातून तीव्र भक्ती व्यक्त केली आणि 'जोहार, मायबाप जोहार' म्हणत विषमतेवरून प्रहार केला. त्यांनी 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा, काय भुललासी वरलिया रंगा' असे म्हणत, माणूस जन्माने नव्हे तर कर्माने श्रेष्ठ असतो, हा विचार मांडला. त्यांची समाधी पंढरपूरला विठ्ठल मंदिराच्या पायथ्याशी आहे. १९०५ मध्ये त्यांच्या समाधीच्या छत्रीच्या उद्घाटनाला असंख्य जनसमुदाय उपस्थित होता. या असंख्य जनसमुदाया समोर गाडगे बाबांनी अस्पृश्यतेवर प्रहार करत विचारले,

`अमेरिकेत शिवाशिव आहे का?` `लोक म्हणाले नाही`
`इलायतेत शिवाशिव आहे का?``लोक म्हणाले नाही`
`जपानमंदी शिवाशिव आहे का?` `लोक मानले नाही`
`हिंदुस्थानमधी शिवाशिव आहे काय? `उत्तर हो`
उत्तर मिळाल्यावर बाबांनी पुन्हा दुसऱ्या`प्रश्नांची मालिका सुरू केली
अमेरिकेत लोक सुखात आहे की दु:खात? उत्तर सुखात
चीनमधील लोक सुखात आहे की? दु:खात उत्तर सुखात
जपानमधील लोक सुखात आहे की दु:खात? उत्तर सुखात.

अशा प्रकारची उत्तर मिळाल्यानंतर बाबा पुन्हा व्रहाडी भाषेत प्रति प्रश्न करायचे अरे! रे! बापोह शिवाशिव बाळगूनही आमचे हिंदुस्थानचे लोक दु:खात आहेत? अमेरिकेतील लोकांजवळ मोटारी आहेत, अमेरिकेतील लोकांना मोटारी आहे, घरदार झक्कास आहेत, बाया मानसाचा गोंजार आहे, चीनमधील लोकांजवळ मोटारी आहेत. ते बिस्कुट खातात, बाया माणसाला गोंजार आहेत. अन हिंदुस्थानात पहा ना सभेतील एखाद्या बाईकडे बोट दाखवून मनात बायका कशा दिसतात जशा लावा चूरडणी माणसं कशी दिसतात जसे पाण्याची पितर अन आमच्या मोटारी पहा ना डंगऱ्या बैलांचे खटारे सभेतून हशाच एकच कडून उठतो हसा ओसरता बाबा पुन्हा एक वार करतात आता काहून हसता करा ना शिवाशिव हाकला ना मांगा महाराना दूर नंतर विनोद करून पुन्हा प्रश्नाची मालिका सुरू होईल,

वाघ आपल्यात शिवाशिव पाळतो का? उत्तर नाही.
हत्ती पाळतात का? उत्तर नाही
गाई पाळतात का? उत्तर नाही
मग शेवटी विचारतात गधे आपापसात शिवाशिव पाळतात का? उत्तर नाही

तुम्ही अक्कलवान माणसं असून गद्यापेक्षा निपट्टर काय म्हणावे तुम्हाला अशाप्रकारे साध्या आणि सरळ भाषेत बाबा जातीभेदा बाबत लोकांना समजावून सांगत असे.

## अस्पृश्यांसाठी बाबांनी धर्मशाळांची निर्मिती केली:-

धर्मशाळा म्हणजे भाविक, यात्रेकरू किंवा गरजू लोकांसाठी बांधलेले एक विश्रामगृह किंवा निवासस्थान होय. गाडगेबाबांनी याच उद्देशाने पंढरपूर, नाशिक, मुंबई आणि इतर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अनेक धर्मशाळा बांधल्या, जेणेकरून गरीब लोकांना निवारा आणि आधार मिळू शकेल.आयुष्यात तीर्थयात्रा केल्याने फार मोठे पुण्य लागते, सगळी पापे धुवून निघतात अशी आपली परंपरा असून श्रावणबाळाने आपल्या वृद्ध मातापित्यांना कावडीत बसवून तीर्थयात्रा घडविली. तीर्थक्षेत्री मृत्यू आल्यास मोक्ष मिळतो असेही शास्त्रपुराणे सांगतात. याच रीतीचा फायदा घेत कालांतराने तीर्थक्षेत्रांचा व्यापार झाला. तीर्थक्षेत्री देवाच्या नावावर काळाबाजार, गुंडागर्दी, सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना, अस्पृश्यता, बडवेगिरी अशा अनिष्ठ गोष्टीचा शिरकाव झाला. गाडगेबाबा कीर्तनातून लोकांना तीर्थक्षेत्री न जाण्याचे आवाहन करीत, ते कबीराचा पुरावा देत,

जत्रामे फत्रा बिठाया। तीरथ बनाया पानी।
पैसेको घुलघानी। दुनिया भई दिवानी।

ते सांगत, बापहो, तीर्थयात्रेस जावू नका, तिथे हौसे, नवसे, गवसे लोक येतात. पैशाचा नाश होतो. लोक यात्रेला जाणण्यासाठी कर्जबाजारी होतात. तुकोबारायांचा पुरावा देत, दगडाचा देव, बोलील तो कैसा।।

तीर्थक्षेत्री गेले, दाढीमिशी बोडून आले। पाप तैसेची राहीले, दाढीमिशेने काय केले।। गंगेत आंघोळ केल्यामुळे अंगावरील मळ साफ होतो. पाप जात नाही. त्या साठीमानसिक शुद्धी आवश्यक आहे. मनाची शुद्धी हेच तीर्थ आहे. बाबा विचारीत, तुम्ही जगन्नाथास जाता, देव विचारतो कां कधी आलात? जेवले का? चहा प्यायले का? मग कशाला जायचे? पैशाचा नाश करायचा.

परंतू प्राचीन परंपरा केवळ उपदेशाने मोडणे शक्य नाही. हे जेव्हा बाबांनी जाणले तेव्हा त्यांनी लोकांच्या परिस्थितीकडे लक्ष केंद्रीत केले. अंधश्रद्धाळू समाज नेहमीच तीर्थक्षेत्रावर गर्दी करीत असे. थंडी, ऊन, पाऊस, रोगराई, अन्नपाण्याची टंचाई याची चिंता न करता लोक कर्ज काढून यात्रेस जात असत. पंढरपूरला चिखलात, पावसात, थंडीत लोक रात्र काढीत. संडासाजवळ बसुन भाकरी खात. जे स्पृश्य होते, ज्यांचेजवळ पैसा होता, त्यांना आपल्या अंधाऱ्या घरात दाटीवाटीने आश्रय देवून पंडे, बडवे त्यांची यथेच्छ लूट करीत. जे अस्पृश्य होते त्यांना बाहेर उघडयावर घालीत, जनावरासारखे रहावे लागे. हे सगळे दृष्य पाहून बाबांना चीड येत असे. ते कीर्तनातून तीर्थयात्रेला न जाण्याचा कळकळीचा सल्ला देत. पण लोक ऐकत नसत. ते पाहून त्यांनी तीर्थयात्रेस जाणाऱ्या लोकांच्या निवा-याच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत केले.

गाडगेबाबांनी १९०८ साली ऋणमोचन येथे पत्र्याची धर्मशाळा बांधुन यात्रेकरूंच्या निवाऱ्याची, भांडेकुंड्याची सोय केली संत चोखामेळा महार धर्मशाळा १९१७ आमला येथे हरीजन धर्मशाळा, उमरी (जि. यवतमाळ), मार्की (जि. अमरावती), पिंजर (जि. अकोला), माहुर (निजामस्टेट), मूर्तिजापुर, पंढरपुर, नाशिक, देहू, आळंदी, पूणे, मुंबई अशा अनेक ठिकाणी अस्पृश्यांसाठी, बहुजनांसाठी धर्मशाळा बांधल्या.

धर्मशाळेचे इंजिनियर, कॉन्ट्रॅक्टर बाबा स्वतःच होते. ते मजूरांसोबत श्रमही करीत असत. चांगले लाकूड कर्नाटकातील दांडेलीला मिळते ही माहिती मिळताच बाबा स्वतः एका मुलाला सोबत घेवून दांडेलीला गेले आणि रेल्वेने लाकूड पंढरपूरला घेवून आले. नाशिकला रामनवमी, सिंहस्थ, कुंभमेळा अशाप्रसंगी व इतर ठिकाणी बाराही महीने यात्रेकरूंची गर्दी होत असे. यात्रेकरूंचे खूप हाल होत. गोदावरीच्च्या काटी हनुमानगढी' नावाची एक ओसाड

टेकडी होती. टेकडीजवळ स्मशान होते. बाबांनी धनिकांना आवाहन करून ती जागा सोळा हजार रुपयांना विकत घेतली. आपल्या सहकाऱ्यांसोबत सामुहिक श्रमदान करून १९२८ साली तेथे एक सुंदर भव्य धर्मशाळा उभी केली. काम सुरु असतांना तत्कालीन कलेक्टर मिस्टर पेरी अचानक पाहणी करण्याकरीता आले. ते बाबांचे वेगळे काम व वेगळे व्यक्तीमत्व पाहून प्रभावित झाले. बाबांच्या विनंतीवरून त्यांनी त्या जागेचा कर नेहमीसाठी रद्द केला. याशिवाय तीर्थक्षेत्र नसलेल्या मोठमोठ्या महानगरांमध्ये, दवाखान्यांमध्ये येणाऱ्या रुग्णांच्या सोयीसाटी, प्रवाश्यांसाठी मुंबई, पुणे, मिरज, महाबळेश्वर येथे बाबांनी धर्मशाळा बांधल्या. त्यामुळे निराश्रीत, प्रवासी, रुग्ण त्यांचे नातेवाईक यांची मोठ्या प्रमाणात सोय झाली.

## सारांश

गाडगेबाबांनी साधी जीवनशैली, प्रामाणिकपणा , सेवा, आणि ईश्वरावर निष्ठा या मूल्यांचा लोकांच्या मनावर ठसा उमटवला. आपण सर्वजण एकाच ईश्वराची संतती आहोत, त्यामुळे प्रत्येकाला जगण्याचा हक्क आहे. कोणीही कोणाचे शोषण करू नये आणि सर्वांना समान न्याय मिळावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी संपत्तीचा उपयोग सार्वजनिक कार्यासाठी करण्याचे आवाहन केले. आपल्या कर्ममय जीवनातून त्यांनी श्रमाचे महत्त्व जगाला पटवून दिले. साध्या माणसांवर आणि प्राण्यांवर प्रेम करण्याचे, संयमाचे, आणि समान न्यायाचे तत्वज्ञान त्यांनी जगाला सांगितले.

अश्या प्रकारे संत गाडगे बाबांनी अस्पृश्यता आणि जातीभेद निर्मूलनासाठी केवळ उपदेश केला नाही, तर आपल्या आचरण, प्रबोधन आणि समाजोपयोगी संस्थांच्या माध्यमातून मतपरिवर्तन आणि सामाजिक समरसतेची पायाभरणी केली.

## संधर्भ साधने

१) भगत, रा. तू. — संत गाडगेबाबांच्या आठवणी, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, १९९२,.
२) घोंगटे, स. यु. — गाडगे महाराज, प्रकाशन समिती, मुंबई, १९३९,
3) केचे, मधुकर — श्री संत गाडगे महाराज, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,
४) जामनेकर, डॉ. भानुदास — भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व विदर्भातील संत, आधार पब्लिकेशन, अमरावती,
५) पापडकर, लक्ष्मण पुंडलिक — संत गाडगे बाबा, विदुला प्रकाशन, परतवाडा, १९७०
६) चराटे, गुणवंतराव — संत गाडगेबाबांच्या सानिध्यात, गाडगे महाराज प्रकाशन समिती, मुंबई,
७) दांडेकर, गो. नी. — गाडगे महाराज, मॅजेस्टीक प्रकाशन् मुंबई,
८) सिंग, डॉ. कमल — गाडगे महाराज, गाडगे महाराज प्रकाशन समिती, मुंबई, डिसेंबर २०००,
९) कडवे, रघुनाथ — वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, श्री गुरुदेव मुद्रणालय, नागपूर,
१०) भगत, रा. तू. (संपा.) — गाडगे महाराज गौरव ग्रंथ, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर,
११) गेडाम, टी. सी. — संत गाडगेबाबा : जीवनदर्शन, प्रबुद्ध भारत पुस्तकालय, नागपूर, २०१३,
१२) ठाकरे, के. सी. — प्रबोधनकार : श्री संत गाडगेबाबा, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, १९१४